# 2. बालकांचा विकास.

| Page No. | |
|---|---|
| Date | |

1. बालकांचा विकास : बालविकासातील समस्या सांगून समस्यावरील उपाययोजनना स्पष्ट करा.

**प्रस्तावना :**

मानवी हक्क विषयातील एक महत्त्वपूर्ण प्रकरण म्हणून बालविकास ही संकल्पना घेतली. बालकाच्या जन्मपूर्वे व जन्मोत्तर अवस्था निर्माण होणाऱ्या समस्याचा अभ्यास करून शासनाने उपाययोजना सुचवल्या आहेत.

UNO ने 1979 हे वर्षे आंतरराष्ट्रीय बालक वर्षे म्हणून जाहिर केले. 12 June हा दिवस जागतिक कामगार-विरोधी दिन म्हणून मान्यता दिली. तर भारतशासनाने पं. नेहरूचा जन्मदिवस 14 नोव्हेंबर बालदिन म्हणून साजरा करण्याची परवानगी केंद्रशासनाने वेळोवेळी बालकांच्या विकासासाठी बालकाची धोरणे जाहिर केली. यानुसार अनेक प्रयत्न करूनही यात समस्या निर्माण झाल्या आहेत.

**बालविकासातील समस्या**

1) अर्भक मृत्यू
2) कुपोषण
3) बालकामगार
4) बालशिक्षण.

**1) अर्भक मृत्यू :**

एका वर्षात 1000 अर्भकामागे मृत्यू पावणाऱ्या अर्भकांची संख्या होय.

Page No.
Date

## अर्भक मृत्यूचे प्रकार (५)

| पारंभीक अर्भक मृत्यू | कालांतरित अर्भक मृत्यू | नवजात अभ्रक मृत्यू | नवजातोत्तर अर्भक मृत्यू |
|---|---|---|---|

**प्रारंभिक आर्भक मृत्यू :**

अर्भक जन्मापासून 7 दिवसांच्या आत एकुण जन्मलेल्या अर्भकांच्या मृत्यूची संख्या म्हणजेच प्रारंभिक अर्भक मृत्यूदर होय.

**कालांतरित अर्भक मृत्यू :**

अर्भक जन्मापासून 7 - 29 दिवसाच्या आत 1 हजार अर्भकांमागे मृत्यू पावणाऱ्या अर्भकांच्या संख्या म्हणजे कालांतरित अर्भक मृत्यूदर होय.

**नवजात अर्भक मृत्यूदर :**

अर्भक जन्माल्यापासून ते 29 दिवसाच्या आत 1 हजार अर्भकांमागे मृत्यू पावणाऱ्या अर्भकांची संख्या म्हणजे नवजात अर्भक मृत्यूदर होय.

**नवजातोत्तर अर्भक मृत्यू :**

अर्भक जन्मल्यानंतर 29 ते 365 दिवसाच्या आत 1 हजार जन्मलेल्या अर्भकामागे मृत्यू पावणाऱ्या अर्भकांची संख्या म्हणजे नवजातोत्तर अर्भक मृत्यू होय.

Page No.
Date

बालविकासाच्या अवस्था → अर्नेस्ट जोन्स

जन्मपूर्व - (250 ते 300 दिवस)
जननावस्था - 0 ते 2 आठवडे
गर्भावस्था - 2 ते 10 आठवडे
भ्रुणावस्था - 10 आठवडे ते जन्मापर्यंत
अर्भकावस्था - जन्मापासून ते 1 महिना

जन्मोत्तर

1) शिशुवास्था
1 महिना ते 2 वर्षे

2) बाल्यवस्था
2 ते 6 वर्षे

3) किशोरावस्था
6 ते 12 वर्षे
पूर्व - 6 ते 9 वर्षे
उत्तर - 9 ते 12 वर्षे

4) पौगंडावस्था
12 ते 14 वर्षे

5) कुमारावस्था

6) युवावस्था

कुमारवस्था - 14 ते 21 वर्षे
युवावस्था - 21 ते 40 वर्षे
प्रौढवस्था - 40 ते 60 वर्षे
वृद्धवस्था - 60 ते मृत्यूपर्यंत

अर्भक मृत्यूची कारणे.

1) कुपोषण
2) अज्ञान
3) अंधश्रद्धा
4) महिलांच्या आरोग्याकडे केलेले दुर्लक्ष
5) आरोग्य विषयक सुविधांचा अभाव
6) मातेच्या आरोग्यविषयक समस्या
7) स्त्री-भ्रुणहत्या.

Date

## उपाययोजना :

1) जननी सुरक्षा योजना :

केंद्र सरकारने इ.स. 2005 पासून मातामृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी व सर्व प्रकारच्या आरोग्य विषयक सुविधा पुरवण्यासाठी ही योजना सुरू केली आहे.

2) जननी शिशु सुरक्षा योजना :

केंद्र सरकारने 1 जून 2011 पासून ही योजना केंद्र आणि राज्यासाठी राबवण्यास सुरुवात केली. या योजनेत माता यांचे मोफत औषधोपचार, बाळंतपण, लसीकरण या द्वारे अर्भक मृत्यू, मातामृत्यूदर कमी करण्यासाठी राबवली गेली.

3) सार्वत्रिक लसीकरण मोहिम :

जगात 1972 पासून लसीकरण मोहिमेला सुरूवात झाली असून भारतात लसीकरण मोहिम 1978 ला सुरवात करण्यात आली तर सार्वत्रिक लसीकरण मोहिम 1985 ला सुरवात झाली. या लसीकरण मोहिमेद्वारे MMR, BCG, पोलिओ यासारख्या लसीकरण मोहिम राबविण्यात आल्या.

4) नवसंजीवनी योजना :

केंद्र सरकारने 25 जून 1995 पासून संपूर्ण भारतात हि योजना सुरू केली महाराष्ट्रातील आदिवासी 15 निवडक जिल्ह्याची निवड करून तेथील माता आणि अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी हि योजना सुरू केली. माता आणि बालकांचे संगोपण, पोषक अन्न द्रव्य, तज्ञ डॉक्टर नियुक्ती इ. कार्य या योजने अंतर्गत केले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम :

5) केंद्र सरकारने ही योजना 6 फेब्रुवारी 2013 पासून सुरू केली असून अंगणवाडी बालवाडी, प्राथमिक शाळेमध्ये बालकाला पोषक अन्न देण्यासाठी योजना सुरू केली.

6) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान :

केंद्र सरकारने 12 एप्रिल 2005 पासून योजना सुरू केली. या योजने अंतर्गत प्रत्येक गावात 1000 लोकसंख्येमागे 1 आशा कार्यकर्ती ची नेमणूक केली. ही आशा कार्यकर्ती त्या गावातील लोकांच्या आरोग्यविषयक माहिती मिळविणे, मोफत औषधोपचार देणे, माता व बालकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाला कळविण्याचे कार्य करतात.

## ☆2 कुपोषण

**व्याख्या :**

पोषक द्रव्याच्या अभावामुळे निर्माण होणारी अवस्था म्हणजे कुपोषण.

**निर्देशक :**

नारंगी रंगाची रिबीन

**निकष :** उंची व वजन (WHO) 2006

**लक्षणे :** 1) हात पाय लहान पोट मोठे

2) अशक्तपणामुळे आजारी पडणे.

Page No.
Date

3) त्वचेखाली चरबी नसणे.
4) निस्तेज डोळे
5) अंगावर सुरकुत्या असणे
6) अशक्त दिसणे.

परिणाम :
1) अर्भक मृत्यूदर, मातामृत्यूदर वाढणे
2) कॅन्सर उद्भवतो.
3) मानसिकतेवर परिणाम
4) शारीरिक दुर्बलता
5) समायोजनाची समस्या निर्माण होते.

कारणे : दारिद्र्य, अंधश्रद्धा,
आरोग्य विषयक अज्ञान, मोठ कुटुंब,
सुविधांचा अभावा, दुष्काळ
व्यसनाधिनता.

उपाययोजना :
1) मध्यान्ह भोजन योजना :
1988 प्रायोगिक तत्वावर प्रथम राजीव गांधीनी सुरु केली. तत्कालीन पं. पि.व्ही. नरसिंगराव यांनी 15 Aug 1995 1 ते 5वी यांना सुरु केली. त्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी 2008-9 6 ते 8 वी यांनी सुरु केली.

2) हिरकणी कक्ष :
केंद्र सरकारने संपूर्ण भारतात तर महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यात योजना सुरु केली. पहिला प्रयोग कोल्हापूर जिल्ह्याने 2008 मध्ये सुरु केला. लहान मुले असणाऱ्या मातांना स्तनपान करता

Page No.
Date

थावे म्हणून सार्वजनिक ठिकाणे, कार्यालय, आरोग्य केंद्र या ठिकाणी या कक्षाची स्थापना करण्यात आली.

3) राजमाता जीजामाता आरोग्य योजना :

ग्रामीण भागातील माता व बालक यांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी व मोफत औषध गोळ्याबरोबरच इतर पोषक आहार उपलब्ध करून देण्यासाठी हि योजना सुरू करण्यात आली.

4) शालेय मोफत आरोग्य तपासणी :-

केंद्र व राज्य सरकारने हि योजना २००४ पासून शालेय स्तरावर 1 ते 4 च्या विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य तपासणी करून आरोग्याचे व कुपोषणाचे परिणाम कमी करून योग्य त्या उपाययोजना राबवण्यासाठी योजना सुरू करण्यात आल्या.

5) राष्ट्रिय एकात्मिक कार्यक्रम :-

केंद्र सरकारने 1975 व राज्य सरकारने 1978 वय 0 ते 5 या दरम्यानतील बालकांच्या कुपोषणाचे परिणाम कमी करण्यासाठी सर्व प्रकारच्या आरोग्य विषयक सुविधा देण्यासाठी कडधान्य युक्त पोषक आहार देण्यासाठी ही योजना सुरू केली.

Page No.
Date

4. बालकामगार :
जे बालके 17 वर्षांच्या आतील असुन उपजिवेकेसाठी कष्ट करून पैसा कमवतात अशा बालकांना बालकामगार म्हणतात.

बालकामगाराचा उपयोग :
जागतिक कामगार संघटना UNDP, UNO UNSSO राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण इ. संघटनांनी 15 वर्षांच्या आतील मुले जे काम करतात. ते बालकामगार म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण यांच्या नुसार भारतात सर्वाधिक बालकामगार असणारे राज्य पुढीलप्रमाणे.
1) UP 2) बिहार 3) महाराष्ट्र

बालकामगाराचे प्रकार :

1) मुख्य बालकामगार :
जे बालके एका वर्षात 10 महिन्यापेक्षा अधिक कालावधिसाठी कार्य करतात. त्यांना मुख्य बालकामगार म्हणतात.

2) सीमांतर बालकामगार :
जे बालके एका वर्षात 10 महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी कार्य करतात त्यांना सीमांत बालकामगार म्हणतात.

* बालकामगाराचे इतर प्रकार :

1) बालकामगार :
Hotel, दुकाने, बुटपॉलिश, फटाके, कारखान

Page No.
Date

फटाके कारखाने या ठिकाणी आढळणाऱ्या बालकामगारासाठी.

2. दास्यबालकामगार :
आई - वडीलाने तारण म्हणून घेतलेल्या पैशाच्या मोबदल्यात लहान मुलांना दुसऱ्याकडे तारण ठेवलेल्या असलेल्यांना दास्यबकामगार म्हणतात.

3. रस्त्यावरील कामगार :
भंगार, प्लॅस्टिक गोळा करणे, भीक मागणारे.

4. स्थलांतरित कामगार :
आई - वडील कामासाठी स्थलांतरित होत असल्याने बालके स्थलांतरीत होत असतात. ऊसतोड, विटभट्टी.

5. घरगुती बालकामगार :
आज जगात आणि भारतात घरकामासाठी मोठ्या प्रमाणात बालकामगाराच्या उपयोग केला जातो.

6. शेतीमधील बालकामगार :
आजही ग्रामीण भागामध्ये आई - वडिलांबरोबर 12 - 18 तास काम करणारे बालकामगार पहायला भेटतात.
उदा., सोयाबीन कापणी, हंगामी कामे.

7. लैंगिक अत्याचाराला बळी पडलेले कामगार :
जगात आणि भारतात बालकामगाराच्या वापर लैंगिक अत्याचारासाठी वापर केला जातो.

Date

बालकामगार वाढीचे कारणे → दारिद्र्य
व्यसनाधिनता
अशिक्षित पालक
पती - पत्नीतील घटस्फोट
स्वस्तात बाल कामगारांची उपलब्धता
मोठे कुटुंब या कारणांमुळे प्रमाण वाढते आहे.

उपाययोजना :
घटनेतील तरतूदी : 21 : 6-14 मोफत शिक्षण व सक्तीचे
क 23 ) व्यक्तींच्या अपत्यावर करता येणार नाही.
24) 14 वर्षांच्या आतील मुलांना वेठबिगार करता येणार नाही.
→ जागतिक बालकामगार विरोधी दिन : जगात व भारतात दरवर्षी 12 June दिवस तर 14 Nov बाल दिन म्हणून साजरा.

बाल न्यायालयाची स्थापना. → नाशिक
महाराष्ट्रात राष्ट्रीय बालकामगार कायदा 2000नुसार
बालकामगार विरोधी कायदा 1986 तर सुधारणा 2013

1986 च्या कायद्यानुसार ज्या मालकाकडे बालकामगार सापडतो त्या मालकांना 3 years ची जेल तर 20,000 दंड

2013 च्या कायद्यानुसार ज्या मालकाकडे दुसऱ्यांदा बालकामगार सापडतो त्या मालकाला 6 वर्षे ची जेल तर 50,000 दंड.

4. बालशिक्षण :-

प्रस्तावना :

शिक्षण हा शब्द 'Educare' या शब्दापासून तयार झालेला असून याचा अर्थ पुढे ढकलने किंवा मार्गदर्शन करणे असा अर्थ होतो. शिक्षणामुळे व्यक्तीचा बौध्दीक, क्रियात्मक, भावनात्मक असा सर्वांगिण विकास होतो. आंबेडकर-यांच्या मते शिक्षण हे वाघिणीच दुध आहे ते पिल्यास धुरधुरलेल्या शिवाय राहणार नाही. असं शिक्षणाच महत्त्व आहे. त्याबद्दल पुढील माहिती पाहूया.

व्याख्या :

1. उपनिषेध :

सा विदया या मुक्ती. विदयेशिवाय मुक्ती नाही.

2. शंकराचार्य :

शिक्षण म्हणजे आत्मसाक्षात्कार

3. रविंद्रनाथ टायगोर :

शिक्षण म्हणजे साक्षात्कार.

4. स्वामी विवेकानंद :

व्यक्तीच्या ठायी असणारा पूर्णत्वाचा विकास.

5. म. गांधी :

मन, बुध्दी, मनगट 'उम' चा विकास म्हणजे शिक्षण.

Date

## शिक्षणाचे प्रकार

प्रकार :

| औपचारिक | अनौपचारिक | सहज |
|---|---|---|
| शाळा, महाविद्यालय | मुक्तविद्यापिठ | कुटुंब. |

वैशिष्ट्ये :

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
शिक्षण हे त्रिकेंद्रात्मक आहे. (कुटुंब, शाळा, समाज)
शिक्षणामुळे बौध्दीक, सर्वांगीण विकास होतो.
प्रत्येक प्राणी जगण्यासाठी शिक्षण प्राप्त करतो.
शिक्षण ३ प्रकारे चालते.

समस्या :


1. घरापासून शाळा दूर असणे.
प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव.
मुलींच्या स्वतंत्र शाळेचा आभाव.
स्त्री शिक्षिकेचा अभाव.
रुढी - रुढीती.
भौतिक सुविधेचा अभाव.
पालकांचा दृष्टिकोन.
व्यावसायीक शिक्षणाचा आभाव.
नियोजीत आभ्यासक्रमाचा आभाव.
पालकांचे अज्ञान

उपाययोजना :

1 सर्व शिक्षा अभियान
केंद्र सरकारने ही योजना 2001 तर राज्य सरकारने 2002 पासून हि योजना सुरु केली असून वरनी हा केंद्र बिंदू मानून मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यासाठी

Page No.
Date

व शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी केंद्र सरकारने हि योजना सुरू केली. ४० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक, शालेय पोषण आहार, विनापरतीचे मोफत पुस्तक गणवेशाचे वाटप, शाळांना भौतिक सुविधा, प्रयोगशाळा.



सारे शिकुया पुढे जाऊया

2. माध्यमिक शिक्षा अभियान :

केंद्र सरकारने २००९ पासून माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी व प्रचारासाठी, शिक्षणाच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रिय माध्यमिक शिक्षा अभियान सुरू केले. याद्वारे अभ्यासक्रम, परिक्षापध्दती, शिक्षक मापन, व भौतिक सुविधा इ. तरतूद. 2017 पासून 100 उपस्थिती वाढविणे, व गळतीचे आणि स्थगितीचे प्रमाण कमी करणे.

3. मध्यान्ह भोजन योजना :

इ.स. १९८४ मध्ये तत्कालीन प. पं. राजीव गांधी यांनी प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन योजना सुरू केली. तर 15 Aug 1995 रोजी पं. पि. व्ही. नरसिंहराव यांनी १ ते ५ साठी मध्यान्ह भोजन योजना सुरू केली तर इ.स. २००८ मध्ये पं. मनमोहन सिंग यांनी 6 ते 8 साठी योजना सुरू केली.

4. कस्तुरबा गांधी विद्यालय :

या योजनेद्वारे अनुसुचित जाती, जमाती, मागासवर्गीय, अल्पसंख्याय यासाठी 75% जागा राखीव तर 25% दारिद्र्यरेषेखालील पालकांच्या मुले 5 ते 10 साठी स्वतंत्र मुलींची निवासी शाळा म्हणून केंद्र सरकारने जुलै 2004 पासून हि योजना सुरू केली आहे.

5. अहिल्याबाई होळकर मोफत बस पास योजना.

इ.स. 1996-97 पासून पं.पि.व्हि. नरसिंहराव यांनी योजना सुरू केली इ. 5 ते 10, मध 5 ते 12 च्या मुलींना एका गावातून दुसऱ्या गावात शिक्षण ~~[illegible]~~ घेणेसाठी मोफत पास, ब्रिप वाक्य वाट पाहिजा पण एसटीनेच जाईल.

6. मुलींसाठी उपस्थिती भत्ता :

म. तत्कालीन मुख्यमंत्री, विलासराव देशमुख यांनी 10 जानेवारी 1992 पासून शासन निर्णयद्वारे 1 ते 4 च्या मुलींसाठी अनुसुचीत जाती-जमाती मागासवर्गीय मुलींसाठी प्रतिदिन 1 रु. प्रमाणे उपस्थिती ठेवण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची असून 75% ~~असून~~ उपस्थिती असल्यावर वार्षिक 240 रु.

7. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना।

केंद्र सरकारने 1983 पासून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींना हि योजना लागू केली असून ज्या मुलींचे पालक गरीब आहेत त्यांना शाळेचे मुख्याध्यापक किंवा प्रतिष्ठित व्यक्तीने दत्तक घेऊन प्रति महा

Page No.
Date

30 २१ शैक्षणिक खर्च भागवण्यासाठी मदत करावी.

8 राष्ट्रिय एकात्मिक विकास कार्यक्रम :
केंद्र सरकार 1975, राज्यसरकारने 1978 हि योजना 0 ते 6 च्या बालकांच्या विकासासाठी व प्राथमिक स्थरावर सर्व समावेशक शिक्षण देण्यासाठी ? हि योजना सुरू केली.

9. वस्ती शाळा :
2002 पासून निर्मिती. किमान 15 ते 20 विद्यार्थ्यांमागे 1 ते 4 साठी हि शाळा सुरू करण्यात आली. दुर्गम, डोंगराळ, आदिवासी भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुरू करण्यात आल्या.
म. फुले शिक्षण हमी योजना 2000 - 1 ते 4
म. फुले उच्च प्राथमिक शिक्षण हमी योजन - 2005-06 - 5 ते 7
साखर शाळा - ऊस तोड कामगार मुलांसाठी
भोंगा शाळा - ठाणे जिल्ह्यातील विटभट्टींवरील काम-करणाऱ्या मुलांसाठी.
पाशान शाळा - खदंडी खाणीतील मुलांसाठी.
सेतू शाळा - 2009 (1 मे ते 15 जून) शाळेच्या प्रवाहाच्या बाहेर असणाऱ्या मुलांसाठी
अनौपचारिक शिक्षण - 6 ते 14 वयोगट - 2002-03

10 राष्ट्रिय शैक्षणिक धोरण :
1968 -
1986
2005
2016

Date

शैक्षणिक घटनेतील तरतुदी. ६ ते १४
कलम २१ अ - मोफत सक्तीचे.
कलम ४५ - ० ते ६ अनौपचारिक शिक्षण
कलम ५१(अ) - ० ते ६ पालकांचा कर्तव्य.
कलम ३५०(अ) - भारतातील प्रत्येक राज्याच्या प्राथमिक शिक्षणाचे माध्यम अल्पसंख्यांसाठी मातृभाषा असेल.

<u>आयोग</u> :

राधाकृष्ण आयोग

समिती
जे.पी. नाईक समिती.
दुर्गाबाई देशमुख समिती